कृषि विभागातील विविध योजनांमधील
अस्थायी पदे सन २०१९-२० मध्ये चालू
ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक: पदसातत्य -२०१९/प्र.क्र.३८/११अे,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- २७ फेब्रुवारी, २०१९

वाचा :-

१. शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. पदसातत्य - २०१८ / प्र.क्र.१९२/ ११-अे, दि.२८.०९.२०१८
२. कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ-१११९/साप्र/२५७८/१९-२०/प्रक्र-१३/आस्था-५ (निप)/५४, दि.१३.०२.२०१९
३. कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ-१११९/साप्र/२५६९/१९-२०/प्रक्र-१२/आस्था-५ (निप)/५२, दि.१३.०२.२०१९
४. कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ-१११९/साप्र/०७३५/१९-२०/प्रक्र-७/आस्था-५ (निप)/५९, दि.१३.०२.२०१९
५. कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ-१११९/साप्र/०९९६/१९-२०/प्रक्र-१३/आस्था-५ (निप)/६१, दि.१३.०२.२०१९
६. कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ-१११९/साप्र/०७४४/१९-२०/प्रक्र-१३/आस्था-५ (निप)/६०, दि.१३.०२.२०१९
७. वित्त विभाग शासन निर्णय क्र.पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.२१.०२.२०१९

प्रस्तावना :-

जागतिक कृषि गणना योजना, महाराष्ट्र राज्यातील प्रमुख पिकांचे क्षेत्रफळ वेळेवर कळविण्याची योजना, पिकांचे आकडेवारीत सुधारणा करण्याची योजना, शेतकरी मासिक योजना त्याचप्रमाणे कृषिविषयक माहिती पथक या योजनांमधील अस्थायी पदे (सहा महिन्यापेक्षा जास्त काळ रिक्त असलेली पदे वगळून) सन २०१८-१९ मध्ये दिनांक ०१.१०.२०१८ ते २८.०२.२०१९ या कालावधीकरिता चालू ठेवण्यास उपरोक्त क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

२. ज्या शासकीय विभाग व कार्यालयातील सर्व मंजूर पदांचा सर्वंकष आढावा पूर्ण होऊन उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने सुधारित आकृतिबंध निश्चित करण्यात येऊन शासन निर्णय निर्गमित झालेला आहे अशा सर्व शासकीय विभाग व कार्यालयातील सुधारित आकृतिबंधातील सर्व अस्थायी पदांना आवश्यकतेनुसार दि.०१.०३.२०१९ ते दि.३०.०९.२०१९ पर्यंत पुढील मुदतवाढ देण्याचे अधिकार उपरोक्त संदर्भ क्रं. ७ येथील वित्त विभागाच्या दि. २१.०२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना देण्यात आलेले आहेत.

३. वित्त विभागाच्या दि.२१.०२.२०१९ च्या शासन निर्णयातील निदेशांच्या अनुषंगाने, प्रशासकीय विभागांनी त्यांच्या आस्थापनेवरील व कार्यालयातील मंजूर पदांचा आढावा घेवून सुधारित आकृतिबंध निश्चित करुन त्यास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्याची कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करण्याचे निदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने या शासन निर्णयासोबत जोडलेली विवरणपत्र **"अ", "ब", "क" "ड"व इ** मध्ये नमूद योजनांतर्गत अस्थायी पदांना दि.०१.०३.२०१९ पासून दि.३०.०९.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

"जागतिक कृषि गणना योजना, महाराष्ट्र राज्यातील प्रमुख पिकांचे क्षेत्रफळ वेळेवर कळविण्याची योजना, पिकांचे आकडेवारीत सुधारणा करण्याची योजना, शेतकरी मासिक योजना त्याचप्रमाणे कृषिविषयक माहिती पथक योजना" या योजनांतील या शासन निर्णयासोबत जोडलेली विवरणपत्र **"अ", "ब", "क" "ड"व इ** मध्ये दर्शविलेली अनुक्रमे १३, ५८, २२ , ९ व ७ अस्थायी पदे दि.०१.०३.२०१९ ते दि.३०.०९.२०१९ या कालावधीकरिता चालू ठेवण्यास या आदेशान्वये शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.२१.०२.२०१९ अन्वये मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०२२७१५२९०५८९०१ असा आहे. प्रस्तुत शासननिर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Dr.Kiran Patil
Date: 2019.02.27 15:31:19 +05'30'

(डॉ.किरण पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
२. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
३. उप सचिव (११-अे), / यांचे स्वीय सहायक कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४. उपसचिव (अर्थसंकल्प),यांचे स्वीय सहायक कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५. सर्व विभागीय (महसूल) आयुक्त
६. कृषि संचालक (सर्व)
७. सर्व विभागीय कृषि सहसंचालक

८. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
९. कृषि सहसंचालक (आस्थापना-५), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
१०.संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नवीन प्रशासकीय भवन, शासकीय वसाहत, चेतना कॅालेज समोर, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
११.महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
१२.सचिव, केंद्र शासन, कृषि मंत्रालय, कृषि व सहकार विभाग, कृषि भवन, नवी दिल्ली-१ (पत्राने)
१३.अर्थ व सांख्यिकी सल्लागार, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, कृषि भवन, नवी दिल्ली-१ (पत्राने)
१४.संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई
१५.जिल्हा कोषगार अधिकारी, पुणे/ठाणे/नाशिक/लातूर/कोल्हापूर/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
१६.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१७.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१८. नियोजन विभाग (१४३१), मंत्रालय, मुंबई-३२
१९.वित्त विभाग (व्यय-१), (अर्थसंकल्प-१३), (वि.सु.-१), मंत्रालय, मुंबई-३२
२०.कक्ष अधिकारी (२-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२१.निवड नस्ती (११-अे).

<u>विवरणपत्र 'अ'</u>

शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्रमांक :- पदसातत्य-२०१९/प्र.क्र.३८/११-अे,

दिनांक : २७ फेब्रुवारी, २०१९ चे सहपत्र

<u>जागतिक कृषि विषयक गणना योजनेतील अस्थायी पदांचे विवरणपत्र</u>

अ. क्र.	पदनाम	वेतनश्रेणी		कार्यालय	मुदतवाढ देण्यात आलेल्या अस्थायी पदांची संख्या	लेखाशीर्ष
		मूळ वेतन	ग्रेड पे			
१	२	३	४	५	६	७
१	उप आयुक्त, कृषि गणना (म.कृ.से., गट-अ) (सहसंचालकांचे पदावनत केलेले पद)	१५,६००-३९,१००	६६००	कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे	१	"मागणी क्र. डी - ३ २४०१ - पीकसंवर्धन १११ - कृषि अर्थशास्त्र व सांख्यिकी केंद्र पुरस्कृत योजना (००) (१०) जागतिक कृषि गणना (१०० टक्के केंद्र पुरस्कृत) (२४०१ ०९९६)"
२	सांख्यिक कृषि गणना (म.कृ.से., गट-अ)	१५,६०० -३९,१००	५४००		१	
३	सहाय्यक सांख्यिक अथवा तंत्र अधिकारी, (म.कृ.से., गट-ब)	९३००-३४,८०० ९३००-३४,८००	४४०० ४६००		१	
४	वरिष्ठ सांख्यिकी सहायक/कृषि अधिकारी, (गट-ब) (कनिष्ठ)	९३००-३४,८००	४४००		१	
५	सांख्यिकी पर्यवेक्षक, गट-क	९३००-३४,८००	४२००		२	
६	सहाय्यक अधिक्षक, गट-क	९३००-३४,८००	४२००		१	
७	वरिष्ठ लिपिक / लघुटंकलेखक, गट-क	५२००-२०,२००	२४००		१	
८	लघुलेखक (उच्च श्रेणी), गट-ब (अराजपत्रित)	९३००-३४,८००	४४००		१	
९	लिपिक, गट-क	५२००-२०,२००	१९००		१	
१०	जीप चालक, गट-क	५२००-२०,२००	१९००		१	
११	शिपाई, गट-ड	४४४०-७४४०	१३००		२	
	एकूण				**१३**	

<u>विवरणपत्र 'ब'</u>

शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्रमांक :- पदसातत्य-२०१९/प्र.क्र.३८/११-अे,

दिनांक २७ फेब्रुवारी, २०१९ चे सहपत्र

<u>महाराष्ट्र राज्यातील प्रमुख पिकांचे क्षेत्रफळ वेळेवर कळविण्याची योजना</u>

अ. क्र.	पदनाम	वेतनश्रेणी		कार्यालय	मुदतवाढ देण्यात आलेल्या अस्थायी पदांची संख्या	लेखाशीर्ष
		मूळ वेतन	ग्रेड पे			
१	२	३	४	५	६	७
१	कृषि उपसंचालक (सां.)म.कृ.से.वर्ग-१	१५६००-३९१००	५४००	कृषि आयुक्तालय	१	मागणी क्र.डी-३ २४०१- पीक संवर्धन १११- कृषि अर्थशास्त्र व सांख्यिकी केंद्र पुरस्कृत योजना (००) (०९) कृषिविषयक आकडेवारीचा वेळेवर अहवाल देणे. (२४०१ २५६९)
२	कृषि पर्यवेक्षक	९३००-३४८००	४२००		१५	
३	लघुलेखक (नि.श्रे.)	९३००-३४८००	४३००		१	
४	लिपिक	५२००-२०२००	१९००		१	
५	शिपाई	४४४०-७४४०	१३००		१	
	एकूण				**१९**	
६	तंत्र अधिकारी (सांखिकी) म.कृ.से.वर्ग-२	९३००-३४८००	४६००	विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक	१	
७				विभागीय कृषि सहसंचालक,लातूर	१	
८				विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती	१	
९				विभागीय कृषि सहसंचालक, नागपूर	१	
	एकूण				**४**	
१०	कृषि अधिकारी	९३००-३४८००	४४००	विभागीय कृषि सहसंचालक, पुणे	१	
११				विभागीय कृषि सहसंचालक, ठाणे	१	
१२				विभागीय कृषि सहसंचालक, कोल्हापूर	१	
१३				विभागीय कृषि सहसंचालक, औरंगाबाद	१	
	एकूण				**४**	
१४	कृषि पर्यवेक्षक वर्ग-३	९३००-३४८००	४२००	विभागीय कृषि सहसंचालक, पुणे	२	
१५				विभागीय कृषि सहसंचालक, ठाणे	२	
१६				विभागीय कृषि सहसंचालक, कोल्हापूर	२	
१७				विभागीय कृषि सहसंचालक, औरंगाबाद	२	
१८				विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक	५	
१९				विभागीय कृषि सहसंचालक, लातूर	५	
२०				विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती	५	
२१				विभागीय कृषि सहसंचालक, नागपूर	५	
	एकूण				**२८**	
२२	शिपाई	४४४०-७४४०	१३००	विभागीय कृषि सहसंचालक, ठाणे	१	
२३				विभागीय कृषि सहसंचालक, कोल्हापूर	१	
२४				विभागीय कृषि सहसंचालक, औरंगाबाद	१	
	एकूण				**३**	
	एकुण				**५८**	

विवरणपत्र 'क'

शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्रमांक :- पदसातत्य-२०१९/प्र.क्र.३८/११-अे,

दिनांक : २७ फेब्रुवारी, २०१९ चे सहपत्र

पिकांचे आकडेवारीत सुधारणा करण्याची योजना

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी		कार्यालय	मुदतवाढ देण्यात आलेल्या अस्थायी पदांची संख्या	लेखाशीर्ष
		मूळ वेतन	ग्रेड पे			
१	२	३	४	५	६	७
१	कृषि पर्यवेक्षक	९३००-३४८००	४२००	कृषि आयुक्तालय	२	मागणी क्र.- डी-३ २४०१ - पीकसंवर्धन १११ - कृषि अर्थशास्त्र व सांख्यिकी केंद्र पुरस्कृत योजना (००) (११) पिकांच्या आकडेवारीत सुधारणा (केंद्र पुरस्कृत) (२४०१ २५७८)
	एकूण				**२**	
२	तंत्र अधिकारी (सांखिकी)	९३००-३४८००	४६००	विभागीय कृषि सहसंचालक, पुणे	१	
३				विभागीय कृषि सहसंचालक, ठाणे	१	
४				विभागीय कृषि सहसंचालक, कोल्हापूर	१	
५				विभागीय कृषि सहसंचालक, औरंगाबाद	१	
	एकूण				**४**	
६	कृषि पर्यवेक्षक	९३००-३४८००	४२००	विभागीय कृषि सहसंचालक, पुणे	३	
७				विभागीय कृषि सहसंचालक, ठाणे	३	
८				विभागीय कृषि सहसंचालक, कोल्हापूर	३	
९				विभागीय कृषि सहसंचालक, औरंगाबाद	३	
	एकूण				**१२**	
१०	शिपाई	४४४०-७४४०	१३००	विभागीय कृषि सहसंचालक, पुणे	१	
११				विभागीय कृषि सहसंचालक, ठाणे	१	
१२				विभागीय कृषि सहसंचालक, कोल्हापूर	१	
१३				विभागीय कृषि सहसंचालक, औरंगाबाद	१	
	एकूण				**४**	
	एकूण				**२२**	

<u>विवरणपत्र “ड”</u>

शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्रमांक-पदसातत्य-२०१९/प्र.क्र.३८/११अे,

दिनांक : २७ फेब्रुवारी, २०१९ चे सहपत्र

<u>शेतकरी मासिक योजना</u>

अ.क्र	पदनाम	वेतनश्रेणी		कार्यालय	मुदतवाढ देण्यात आलेल्या अस्थायी पदांची संख्या	लेखाशीर्ष
		मूळ वेतन	ग्रेड पे			
१	२	३	४	५	६	७
	वर्ग-३			कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे		"मागणी क्र-डी-३ २४०१-पीकसंवर्धन १०९, विस्तार व प्रशिक्षण (०१) (०२) शेतकरी मासिक (२४०१ ०७४४)
१	कृषि पर्यवेक्षक	९३००-३४८००	४२००		१	
२	कृषि सहाय्यक	५२००-२०२००	२४००		१	
३	लघुलेखक (नि.श्रे.)	९३००-३४८००	४३००		१	
४	अधिक्षक	९३००-३४८००	४३००		१	
५	वरिष्ठ लिपिक	५२००-२०२००	२४००		१	
६	लिपिक	५२००-२०२००	१९००		१	
	वर्ग-४					
७	शिपाई	४४४०-७४४०	१३००		३	
	एकूण				९	

<u>विवरणपत्र “इ”</u>

शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्रमांक-पदसातत्य-२०१९/प्र.क्र.३८/११अे,

दिनांक : २७ फेब्रुवारी, २०१९ चे सहपत्र

<u>कृषि विषयक माहिती पथक योजनेतील पदांचे विवरणपत्र</u>

अ.क्र	पदनाम	वेतनश्रेणी		कार्यालय	मुदतवाढ देण्यात आलेल्या अस्थायी पदांची संख्या	लेखाशीर्ष
		मूळ वेतन	ग्रेड पे			
१	२	३	४	५	६	७
				कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे		"मागणी क्र-डी-३ २४०१-पीकसंवर्धन १०९, विस्तार व प्रशिक्षण, १०९ (०१) (०१) कृषि विषयक माहिती पथक (२४०१ ०७३५)
१	कृषि उपसंचालक	१५६००-३९१००	६६००			
२	तंत्र अधिकारी	९३००-३४८००	४४००			
३	कृषि अधिकारी	९३००-३४८००	४३००			
४	कृषि पर्यवेक्षक	९३००-३४८००	४२००		१	
५	लघुलेखक (नि.श्रे.)	९३००-३४८००	४३००		१	
६	वरिष्ठ लिपिक	५२००-२०२००	२४००		१	
७	कनिष्ठ लिपिक	५२००-२०२००	१९००		१	
८	अनुरेखक	५२००-२०२००	२४००		२	
९	मुख्य काचचित्रकार	५२००-२०२००	२८००			
१०	वाहनचालक	५२००-२०२००	१९००		१	
११	शिपाई	४४४०-७४४०	१३००			
	एकूण				**७**	